# महावितरण कंपनीचे वीज ग्राहकांप्रती सुरक्षा व्यवस्थापन

आधुनिक काळात वीजेचा सुरक्षितपणे व योग्यरीतीने वापर केल्यास वीज ही मानवास वरदान आहे. या पृथ्वीतलावर सर्वात महत्वाचा आहे मानव व त्याचे जीवन. विजेचा योग्य वापर मानवाच्या सुखसोयीकरिता महत्वाचा आहे.

घरगुती वापर , उद्योगधंदे , रस्त्यावरील पथदिवे , रेल्वे वाहतूक , व्यापार , उद्योग , शेतीसाठी पाणी पुरवठा यासाठी विजेचा वापर अत्यावश्यक आहे. व तो विना अपघात असावा अशी सर्वांची अपेक्षा असते. परंतु अपघात हा अचानक व अकल्पित असतो. अपघात हा आत्मघात नसावा. असुरक्षित काम व सुरक्षा नियमांचे योग्यरीत्या पालन न केल्यामुळे अपघात वाढत आहेत. त्यामुळे अनेकांचे जीव गेले व काहीना अपंगत्व आले तर कंपनीच्या व जनतेच्या मालमत्तेचे नुकसानही खूप झाले.

वीजेचे अपघात आपण वीजेसंबधी ज्ञान मिळवून व विजेचा वापर काळजीपूर्वक करून टाळू शकतो. वीजेबाबत अपुरी माहिती व अपुरा अनुभव यामुळे एखाद्या प्रसंगी विद्युत धक्का बसून प्रसंगी ‘प्राणहानी’ देखील होते.

महावितरण कंपनीची ज्याप्रमाणे ग्राहकांना वीजपुरवठा करण्याची जबाबदारी आहे त्याचप्रमाणे ग्राहकांच्या सुरक्षेची काळजी घेणे ही एक सामाजिक बांधिलकी आहे. त्यासाठी महावितरण कंपनीने काही ठोस पावले उचलली आहेत.

MSEDCL